COEP जंबो हॉस्पिटल कार्यालय,
शिवाजीनगर, पुणे.
जा.क्र. COEP(जंबो)/१४६
दिनांक – ३१/०३/२०२१

## -: कार्यालयीन आदेश :-

विषयः- कामाच्या ठिकाणी महिलांवर होणाऱ्या लैंगिक छळापासून संरक्षण (प्रतिबंध, मनाई आणि निवारण) अधिनियम-२०१३, दि. २२/०४/२०१३ व नियम दि. ०९/१२/२०१३ च्या नियम अधिनियमातील कलम ४ (१) नुसार "अंतर्गत तक्रार समिती" गठीत करणेबाबत.

संदर्भः- १. केंद्र शासनाचा कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळापासून संरक्षण (प्रतिबंध, मनाई आणि निवारण) अधिनियम-२०१३, दि. २२/०४/२०१३ व नियम ०९/१२/२०१३.

२. महाराष्ट्र शासन महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्रमांक मकचौ-२०१३/प्र.क्र.६३/मकक मंत्रालय, मुंबई – ३२, दि. १९ जून २०१४.

३. मा. कार्यकारी समिती, COEP जंबो कोविड हॉस्पिटल कार्यालय यांची दि. ३१/०३/२०२१ रोजीची बैठक.

COEP जंबो कोविड हॉस्पिटलमध्ये कामाच्या ठिकाणी महिलांवर होणाऱ्या लैंगिक छळाच्या तक्रारींची चौकशी करण्यासाठी प्रत्येक कार्यालयात अंतर्गत तक्रार समिती गठीत करणेबाबत संदर्भ क्र. १ नुसार शासन निर्णय प्राप्त झाला आहे.

पुणे महापालिकेतील महिला अधिकारी/सेविकांच्या तक्रारीबाबत चौकशी करण्यासाठी महापालिकेमध्ये अंतर्गत तक्रार समिती खालीलप्रमाणे गठीत करण्यात येत आहे.

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | पदनाम | समिती मधील पदनाम |
|---|---|---|---|
| १. | श्रीमती अंजली साबणे | सहाय्यक आरोग्य अधिकारी | अध्यक्ष |
| २. | श्रीमती आशा राउत | महापालिका सहाय्यक आयुक्त, शिवाजीनगर-घोलेरोड क्षेत्रीय कार्यालय | सदस्या |
| ३. | श्रीमती वैशाली जंगम | प्रतिनिधी, मेड्ब्रोज हेल्थकेअर प्रा.लि. | सदस्या |
| ४. | श्रीमती वैशाली तळपे | वैद्यकीय अधिकारी | सदस्य सचिव |

वरील अंतर्गत तक्रार समितीच्या कामकाजाची खालीलप्रमाणे कार्यकक्षा राहील :-

- सदर समितीची मुदत हि तीन महिने करिता म्हणजे कार्यालयीन आदेशाच्या दिनांकापासून पुढे तीन महिने पर्यंत राहील.

- लैंगिक सतावणूकीच्या तक्रारींची दाखल घेणे व प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने अधिनियामामध्ये घालून दिलेल्या तरतुदीनुसार चौकशी करणे.
- शिस्तभांगाच्या कार्यवाहीचा आढावा घेणे.
- शासनाने वेळोवेळी प्रसूत केलेले शासन निर्णय, परिपत्रक याद्वारे केलेले बदल यांच्या अधीन राहून कार्यवाही करणे.

Rubal 30/3/31

(रुबल अग्रवाल)
अतिरिक्त महापालिका आयुक्त (जनरल) *तथा*
अध्यक्षा, कार्यकारी समिती
COEP जंबो कोविड हॉस्पिटल
पुणे महानगरपालिका